Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2411IV05V12P0009

e-ISSN No. 2394-8426
Special Issue On CPDE Nov'2024
Issue–III(V), Volume–XII

# किशोरवयीन मुलांना 'लिव्ह इन रिलेशनशिप' या नात्याकडे वाढणारा कल : एक सामाजिक दृष्टिकोन

**प्रा. मनिषा पाटील (पाचभाई)**
(बी.ए. मानसशास्त्र, समाजशास्त्र, बी.एड, एम.ए. संप्रेषण, शिक्षणशास्त्र, समाजशास्त्र(A), एम.एस.समुपदेशन)
य. च. मु. मुक्त विद्यापीठ पनवेल (माजी प्राध्यापक)
ईमेल:- manishapachbhai@gmail.com
मोबाईल क्रमांक:- 9082669586

**महत्वाची शब्दावली :- Live-in-relationship – Living together like a married couple without getting married**

## १. प्रास्ताविक:

स्त्री-पुरुषांच्या आयुष्याची पूर्णता ही वंशवृद्धी, मुलांचे संगोपन, शिक्षण, गृहस्थाश्रम आणि वानप्रस्थ तारुण्याची किंवा ठराविक वयात वैवाहिक सौख्याची प्राकृतिक अनुकूलता आणि निरामय आनंदाला ही पिढी पारखी होत आहे. तेही आपणचं स्वतः आपल्याला सतत लोकांची बरोबरी करण्याची सवय व व्यसन लावून घेतले आहे.

अपेक्षांचे ओझे बाळगून भविष्याच्या बाबतीत विचार न करणारी हि पिढी आत्मकेंद्री बनत चालली आहे.स्वतः बरोबर पालकांना सुद्धा आयुष्याच्या वयोवृद्धत्वाच्या टप्प्यावर अनेक समस्या व चिंताना जन्म देत आहे. कारण मुला-मुलींचे लग्न झाल्यावर पालकांची गृहस्थाश्रमाची जबाबदारी संपते. पुढील पिढीकडे सूत्रे देऊन पालक आपल्या निवृत्ती आयुष्याचे नियोजन करु शकतात. आता मागील एक पिढी आणि आताची विवाह न झालेली पिढी यांचे निवृत्तीचे आयुष्य खडतर असण्याची शक्यता जास्त आहे. आजच्या पिढीला कसलीही जबाबदारी नको झाली आहे. फक्त पैसा, प्रॉपर्टी, दागदागिने, गाड्या म्हणजे सर्व सुख नाही. कौटुंबिक आयुष्यात चांगली-वाईट आव्हाने आणि संकटे यांना सामोरे जाताना पतीपत्नी एकमेकांचा मानसिक आधार असतात. जीवनात पूर्णत्वाचा खऱ्या अर्थाने आनंद मिळवायचा असेल तर वाट्याला आलेलं दुःख किंवा प्रतिकुलता सुद्धा सुसह्य होते. ती एकमेकांच्या दृढ सहवासात. सद्य: स्थितीच्या कायद्याच्या तरतुदीनुसार स्त्री - पुरुष स्वतंत्र आहे. व व्यक्ती स्वतंत्र्याचा खरा अर्थ विसरले आहेत.

## २. महत्व :_

सध्या लिव्ह इन रिलेशनशिपचे वाढते प्रमाण सामाजिक समस्या बनले आहे. मध्यप्रदेशातील इंदूर खंडपीठाने एका याचिकेवर सुनावणी करताना या मुद्याला ' सामाजिक शाप' असे संबोधले आहे.लिव्ह इन रिलेशनशिपमुळे लैंगिक गुन्हे पसरण्यास वाव मिळतो आहे. मुंबई तसेच अन्य ठिकाणी देखील लिव्ह इन रिलेशनशिप चे प्रमाण वाढले आहे. सध्याच्या काळात कुटुंबातील सुसंवाद कमी झाल्यामुळेच अनेक

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2411IV05V12P0009

e-ISSN No. 2394-8426
Special Issue On
CPDE Nov'2024
Issue–III(V), Volume–XII

प्रकारच्या समस्या घडत आहेत. मुले अविचारी व स्वैर वागत आहेत. कुटुंबातील मोठ्या व्यक्तींबद्दल भिती आदर नष्ट झाला आहे. जगण्यातले स्वच्छंद स्वातंत्र्य हवे आहे.

त्यामुळेच या विषयावर सखोल संशोधन झाले पाहिजे. कायदेशीर मान्यता जरी या नात्याला मिळाली असली तरी समाजातील नाहक मुलींचे बळी जावू नये म्हणून हे नाते स्वीकारले आहे. मुलांची मानसिकता मृगजळामागे व स्टेटस च्या मागे आहे. लिव्ह इन रिलेशनशिप चा मराठी खरा व स्पष्ट अर्थ ठेवून घेतलेली बाई ( मुलगी ) व ठेवून घेतलेला गडी ( मुलगा ) असा होतो. ऐकायला विचित्र वाटत असेल तरी सत्य वास्तव आहे. उदा:- ब्युटीपार्लर या शब्दाचा अर्थ हजामत किंवा नाव्ह्याचे दुकान असेच आहे. परंतु मनात ब्युटीपार्लर या शब्दाचे मृगजळ आहे.

### ३. गरज:

लिव्ह इन रिलेशनशिप हा एक असा विषय आहे जिथे एक सज्ञान मुलगा व एक सज्ञान मुलगी एकमेकांच्या संमतीने एकत्र रहातात. व शारीरिक संबंध प्रस्थापित करत असतात. स्त्री पुरुष दोघेही सज्ञान असल्याने व एकमेकांची संमती असल्याने भारतीय राज्यघटनेच्या कलम 21 नुसार दोघांना ही स्वातंत्र्य व अधिकार असतो. त्यांच्यावर कोणतीही बंधने किंवा कारवाई करू शकत नाही. सर्वोच्च न्यायालय देखील यापूर्वी अशा लिव्ह इन रिलेशन मधून जेव्हा दिल्लीसारख्या घटना घडतात तेव्हा त्यावर कारवाई काय. अशा समस्यांना घटनांमध्ये कोणत्याही कायदेशीर तरतूदी नाहीत.

त्यामुळे योग्य वेळी योग्य ती समज येणे. या नात्यात येणाऱ्या समस्या व वेळीच दुरदृष्टीकोन ठेवणे गरजेचे आहे. पाश्चात्य देशात सर्रास असलेले हे नाते तेथील लोकांची वैचारिक दृष्टि वेगळी असल्याने तेथील लोक प्रेमाचे व जबाबदारीने हे नाते आयुष्यभर वचनाप्रमाणे सांभाळत आहेत. परंतु भारतीय वैचारिक दृष्टि उदार मतवादी नसुन ती संकुचित व तोकडी आहे. या नात्याकडे पाश्चिमात्य देशात पवित्र मनाने पाहीले जाते तर आपल्याकडे भोग म्हणून. या नात्याच्या नावाने होणारी अवहेलना वेळीच थांबणे गरजेचे आहे.

### ४. संशोधन संकल्पना :-

**लिव्ह इन रिलेशनशिप म्हणजे नेमके काय?**

**उदा:- ब्युटीपार्लर - नाव्ह्याचे किंवा हजामत चे दुकान**

तसेच **लिव्ह इन रिलेशनशिप** - ठेवलेली बाई किंवा ठेवलेला पुरूष असाचं ढोबळ अर्थ होतो.

### ५. संशोधनाचे गृहितके:-

१) सद्य: स्थितीत लिव्ह इन रिलेशनशिप च्या कायद्याच्या तरतुदीनुसार स्त्री - पुरुष स्वतंत्र आहे.
२) लिव्ह इन रिलेशनशिपकडे बघण्याचा प्रत्येकाचा दृष्टीकोन भिन्न आहे.

### ६. उद्दिष्टे :-

१) लिव्ह इन रिलेशनशिपकडे तरूण पिढीचा बघण्याचा दृष्टीकोन काय आहे हे जाणून घेणे.
२) लिव्ह इन रिलेशनशिपला सामाजिक स्थान काय आहे हे जाणून घेणे.
३) लिव्ह इन रिलेशनशिपमुळे होणारे दुष्परिणाम जाणून घेणे.
४) लिव्ह इन रिलेशनशिप भारतीय संस्कृतीवर होणारा दुष्परिणाम जाणून घेणे.
५) किशोरवयीन तरूणांना लिव्ह इन रिलेशनशिप संबंधि भविष्यात येणाऱ्या समस्यांची जाणीव करून देणे.

**७. संशोधनाची परिकल्पना:**

लिव्हिंग रिलेशनशिपमुळे भविष्यात येणाऱ्या समस्या तरूणांच्या लक्षात आल्याने बघण्याचा दृष्टीकोन बदलला.

**८. संशोधनाची प्रश्नार्थक परिकल्पना :**

१) लिव्ह इन रिलेशनशिपला वाजवीपेक्षा जास्त महत्त्व का दिले जात आहे?
२) लिव्ह इन रिलेशनशिपकडे बघण्याचा तरूणांचा दृष्टीकोन काय आहे?
३.) लिव्ह इन रिलेशनशिपकडे बघण्याचा कौटुंबिक दृष्टीकोन काय आहे?
४.) लिव्ह इन रिलेशनशिपकडे बघण्याचा सामाजिक दृष्टिकोन काय आहे?
५.) लिव्ह इन रिलेशनशिपकडे बघण्याचा वैयक्तिक  दृष्टिकोन काय आहे?

**९. संशोधनाची कार्यवाही:**

१) सदर संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.
२) सदर संशोधनासाठी धाराशिव जिल्ह्यातील किशोरवयीन ३३ मुली व ३३ मुलांच्या प्रतिसादांचा समावेश करण्यात आला आहे.
३) सदर संशोधनाच्या माहिती संकलनासाठी ३० प्रश्न असलेल्या प्रश्नावली चा वापर करण्यात आला आहे.
४) सदर संशोधनात प्राप्त माहितीवर सांख्यिकी संस्कार करण्यासाठी शेकडेवारी तंत्राचा वापर करण्यात आला आहे.
५) सदर संशोधनाचे शेकडेवारी तंत्राच्या साहाय्याने निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

**१०. निष्कर्ष**:-

१) म्हणावे तसे स्वतंत्र्य मिळत नाही.
२) लग्न हे बंधन वाटते
३) लग्न या संस्कारात अटी व नियम पाळावे लागते.
४) लग्न झाल्यावर दोघांवरही पडणा-या जबाबदाऱ्या नाविलाजाने संभाळणे अपरिहार्य असते.
५) सध्या लग्न जमण्यासाठीच्या दोन्ही पक्षांकडून अपेक्षा फार आहेत.
६) लग्न जमण्यासाठीच्या मार्गात येणारे अडथळे फार आहेत.
७) लग्न संस्कारात ऋढी परंपरा नाते नियम संस्कार पाळावे लागतात.
८) मुलांना जन्माला घालून कौटुंबिक जबाबदाऱ्या नको आहेत.
९) लग्नाचं वय होवून ही मनासारखा जोडीदार मिळत नाही म्हणून.
१०) आमच्या ही काही अपेक्षा आहेत. ते कुटुंब मानत नाही.
११) मुलींना व महिलांना स्वातंत्र्यांचा खरा अर्थ कळलेलाचं नाही...स्वातंत्र्य म्हणजे स्वतः ची आत्मसन्मान, आत्मविश्वास व आत्मउन्नती चे स्वातंत्र्य होय. परंतु स्वातंत्र्याचा अर्थ स्वैर व स्वच्छंद वागणे असा चुकीचा अर्थ घेतला आहे.
१२) मुलांना कष्ट व ख-या गरजा काय आहेत हे समजण्या आधिचं जास्त वाजवीपेक्षा जास्त मिळत गेले आहे. त्याचा दुष्परिणाम होत आहे.

**११. प्रमुख निश्कर्ष**

१) **७५ %** मुलांच्या मते स्वच्छंद वागण्याची मुभा
२) **८०%** मुलांच्या मते लग्न या संस्कारावरचा उडालेला विश्वास
३) **८०%** मुलांच्या मते या नात्यात देखील समाधान व शांती मिळण्याबाबत अनिश्चितता आहे.
४) **८९%** मुलांच्या मते जातीधर्माचे बंधन नसते याची खात्री आहे
५) **८१%** मुलांच्या मते लग्न या बंधनात समस्या आहेत. त्यापेक्षा लिव्ह इन रिलेशन मध्ये कमी समस्या आहेत असा गैरसमज आहे.
६) **६०%** मुलांच्या मते लग्न करून जोडीदाराशी जमले नाही तर ही भिती आहे.
७) **८१%** मुलांच्या मते कौटुंबिक खोटे नातेसंबंध सांभाळण्याची जबाबदारी नको आहे .
८) **८०%** मुलांच्या मते कसलीही कौटुंबिक जबाबदारी नको असे वाटते.
९) **७५%** मुलांच्या मते आमच्या कडून कुटुंबातील सदस्यांने कोणतीही अपेक्षा ठेवू नये
१०) **६०%** मुलांच्या मते मुले जन्माला घालून त्यांची जबाबदारी नको आहे
११) **९०%** तरूण पिढी सहनशीलता खालावलेली आहे.
१२) **६७%** आजच्या पिढीला सहनशक्ती व धीर नाही.
१३) **७३%** कोणतीही तडजोड नको व जे हवे आहे ते पाहीजेचं.
१४) **७५%** कुटुंबातील वडीलधाऱ्या माणसांची भिंती किंवा आदर शिल्लक नाही.
१५) **८९%** कुटुंबातील नातेसंबंधात प्रेम जिव्हाळा कुठेतरी कमी होत आहे. त्यामुळे सुसंवाद थांबला आहे व त्याचा दुष्परिणाम होत आहे.
१६) **९१** % कुटुंबात कुठेतरी भावनांची अभिव्यक्ती थांबली आहे. त्यामुळे कुटुंबात न मिळणारे प्रेम ते चुकीच्या मार्गाने बाहेर शोधत आहेत.
१७) **८२** % समाजातील मृगजळातील स्टेटस च्या विळख्यात कुटुंब भरडले जात आहे. खरे व वास्तवातील जगणे विसरून गेला आहे. व या खोट्या वागण्याचा मुलांना कंटाळा आला आहे. व त्याचे हे उत्तर आहे.

## १२. उपाययोजना

१) आजच्या पिढीची सहनशीलता खालावलेली आहे.
२) कुटुंबातील सदस्यांनी लहानपणापासून मुलांना जबाबदारीची जाणीव च होवू दिली नाही.
३) मुलांना अती स्वातंत्र्य मिळाले आहे
४) किशोरवयीन वयात मर्यादा अचानकचं सांगितल्या तर पटणार नाही. त्या बालवयातच अंगी ऋजवावाव्या लागतात.
५) एकदा का स्वातंत्र्याची सवय लागली की मुले ऐकून घेत नाहीत.
६) मुलांना चांगल्या वाईटाचा जाणीव देताना समाजातील एखादे उदाहरण डोळ्यासमोर ठेवून द्यावे लागते.
७) स्वैर वागणे व स्वतंत्र विचार या दोन्हीतील फरक समजावून सांगणे गरजेचे आहे.
८) लिव्हिंग रिलेशनशिप अजूनही कायद्याने अपुरी आहे हे समज देणे गरजेचे आहे.
९) लिव्हिंग रिलेशनशिपमुळे समस्या निर्माण झाली तर कायद्याने तोही गुन्हा आहे व तिथेही शिक्षा भोगावी लागते.
१०) अनेकजण आपल्या सोयीनुसार अशा ढोबळ स्वरूपाच्या संबंधांना सुद्धा सर्रास लिव्ह-इन म्हणतात. समाजामध्ये अशा संबंधांबद्दल अनेक गैरसमज व संभ्रम आहेत. विशेषतः तरुण पिढी मध्ये ते जास्त आहेत.

११) आपलं एकमेकांशी जुळेल की नाही ..? हे पडताळून पाहण्यासाठी काही दिवस एकत्र राहणे म्हणजे लिव्ह-इन नव्हे.
१२) कायद्याचे बंधनही नको अन कायद्याचे संरक्षणही हवे अशा दोन बाजूंवर आंदोलीत होणारे हे संबंध तुम्हाला आम्हाला वाटतात तितके सोपे नाहीत.

१३) स्पष्ट चं भाषेत सांगायचे झाले तर इंग्रजी नावात जरी गोडवा वाटत असला तरी मराठी भाषेत ' ठेवलेली बाई ' व ठेवलेला गडी' च म्हणतात.

**१३. भारतीय रूढी परंपरा चालीरीती व समाजव्यवस्था व रचना**

१) भारतीय समाजव्यवस्थेत विवाह हा सामाजिक करार आहे आणि या कराराला कायद्याचे संरक्षण आनंद व मर्यादा सुद्धा आहे.
२) विवाह हा सामाजिक करार असला तरी हा करार संपुष्टात आणता येतो आणि सहमतीने वेगळे होण्याची सुविधा आहेच.
३) लिव्ह-इन ही कायमस्वरूपी तात्पुरती व्यवस्था असून ती केव्हा ढासळेल याची खात्री नसल्यानेच या व्यवस्थेचा  तकलादू आधार घेतला जातो.
४) अतिशय अपवादात्मक परिस्थितीत म्हणजे न्यायालयीन वाद, अनावश्यक रितिभाती, उतारवयातील एकटेपणा टाळण्यासाठी सहजीवनाची आस अशा वेळी लिव्ह-इन हा उत्तम पर्याय ठरू शकतो.
५) न्यायालयाने घातलेले निकष हे विवाहसंस्थेच्याच तत्वाचा पुरस्कार करणारे असतील तर मग विवाहाचे बंधन काय वाईट ?
६) विवाह टाळून यथेच्छ एकमेकांना भोगायचे आणि **गरज सरो किंवा जमलं किंवा झेपलं तर ठीक. नाही तर दोघांचाही मार्ग मोकळा** या तत्वानुसार वाटेल तेव्हा वेगळे व्हायचे यात फारसे तथ्य नाही.
७) 'सर्वकाही हवे पण जबाबदारी नको' हे तत्वच मुळात आधारहीन व मुक्ततावादाला अतिप्रोत्साहन देणारे आहे.
८) सहवासातून प्रेम निर्माण होते सहवासानेच ते दीर्घकाळ टिकते हे लिव्ह इन चे समर्थन ठरू शकते.
९) सामंजस्य हा जरी लिव्ह इन चा कणा असला तरी परस्पर अवलंबित्व, नात्याच्या व पर्यायाने व्यवस्थेच्या जबाबदाऱ्या यात नसतात.
१०) एक पिढी जोवर लिव्ह-इन ची तहहयात सर्वांगीण यशस्वीता बघत नाही तोवर या प्रकारच्या संबंधांची पाळेमुळे फार खोलवर जातील असं वाटत नाही.
११) सर्वमान्य आणि दीर्घकालीन ट्राईड अँड टेस्टेड अशी मजबूत विवाहसंस्था भारतीय समाजात असल्याने लिव्ह-इन ला अति-अल्पसंख्यांक हाच दर्जा राहील असे  वाटते.

१२) आपल्या भारतीय संस्कृतीत माणसाला मृत्यू नंतर ही सन्मान मिळावा अवहेलना होवू नये म्हणून मनूष्य अब्रू आयुष्यभर जप्त असतो. कष्ट करावे लागले तरी माणूस स्वैर वागताना हजारदा विचार करतो.

**संदर्भ सूची :-**

१) डॉ. इंदूमती टी. , डॉ. सौ. सपकाळे, आरती पी., डॉ. भांडारकर, अविनाश ओ., डॉ. सौ. पाटील, पुष्पा जी., प्रा. जगताप, मनिषा वसंतराव., प्रा. चौधरी, दिलीप झेड. ( २०१२ - १३ ) : ' शैक्षणिक संशोधन पद्धती' एम. ए. शिक्षणशास्त्र (प्रथम वर्ष), कुलसचिव उ. मी. वि., जळगाव.

२) डॉ. सोहनी, चित्रा ( मे २००६ ) : प्रायोगिक संशोधन पद्धती, प्रभारी, कुलसचिव, य.च.म.मु.विद्यापिठ, नाशिक ४२२ २२२.

३) डॉ. पोखरापूरकर, राजा ( मे २००६ ) : संशोधनासाठी नमुना निवड, प्रभारी, कुलसचिव, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२..

४) डॉ. जोशी, अनंत व महाले, संजीवनी ( आॅगस्ट २००५) : संशोधन अहवालाची लेखन पद्धती, प्रभारी, कुलसचिव, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२.

५) प्रा.सोमण, मा. शं. (१ जाते. २००८): सामाजिक संशोधनाची तंत्रे, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, १७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

६) केसलर, आरसी, फॉस्टर, सीएल, सॉंडर्स, डब्ल्यूबी, आणि स्टँग, पीई (1995). मानसिक विकारांचे सामाजिक परिणाम, I: शैक्षणिक प्राप्ती. *अमेरिकन जर्नल ऑफ सायकियाट्री*, *152* (7), 1026-1032

७) फर्ग्युसन डीएम, वुडवर्ड एलजे, हॉरवुड एलजे. पौगंडावस्थेतील आणि प्रौढत्वाच्या सुरुवातीच्या काळात आत्महत्येच्या वर्तनाच्या प्रारंभाशी संबंधित जोखीम घटक आणि जीवन प्रक्रिया. मानसशास्त्रीय औषध. 2000; 30(1):23–39.